# महाननगरपालिका व जिल्हापषिद शाळेतील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, संपादन प्रेरणा, व गुणसंपादन – एक तुलनात्मक अभ्यास

संशोधिका : वंदना माथनकर

मार्गदर्शिका: डॉ. राजश्री वैष्णव

## सारांश

शाळेचे वातावरण विदयार्थ्याच्या विकासात महत्वपुर्ण स्थान आहे. प्रस्तुत अध्यनात जिल्हापरिषद व महानगरपालिका ,शाळेतील विदयार्थ्याच्या बुद्धीमत्ता, संपादन प्रेरणा व गुणसंपादनाचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. या अध्ययनात महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळेतील वर्ग ९ व १० च्या एकुण २००० विदयार्थ्याची निवड करण्यात आली. त्यात महानगरपालिका शाळेतील १००० व जिल्हापरिषद शाळेतील १००० विदयार्थ्याची निवड करण्यात आली. अध्ययनाच्या निष्कर्षानुसार जिल्हापरिषद व महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्याच्या बुद्धीमत्ता व संपादन प्रेरणेत फारसा फरक दिसुन येत नाही. तर महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्याच्या गुणसंपादनात फरक दिसुन येतो. निष्कर्षानुसार जिल्हापरिषद शाळेतील विदयार्थ्याचे गुणसंपादन श्रेष्ठ असल्याचे दिसुन आले.

## प्रस्तावना

माध्यमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या कुमारावस्थेतील गरजा पूर्ण करण्यासाठी दिल्या जाणारे शिक्षण होय. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा पुरविण्यासाठी शहरातील स्थानिक प्रशासन संस्था म्हणून महानगरपालिकेने शाळांची निर्मिती केलेली दिसून येते.

त्याचबरोबर ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जिल्हा स्तरावरील प्रशासन संस्था जिल्हा परिषदेने ग्रामिण भागमध्ये माध्यमिक शाळांची निर्मिती केलेली आहे. साधारणत: शहरी भागातीलगरीब कुटुंबातील विद्यार्थी हे महानगरपरिषदेच्या शाळेत शिक्षण घेतांना दिसुन येतात. त्याच प्रमाणे ग्रामिण भागातील बहुतेक विद्यार्थी जिल्हापरिषद संचालित शाळेत प्रवेश घेतात.महानगरपालिका त्याचप्रमाणे जिल्हापरिषद शाळेतहल विद्यार्थी बऱ्याच प्रमाणत बुध्दिमान व हुशार असतात.

विद्यार्थ्यांच्या गुणसंपादनासाठी व शैक्षणिक प्रगतिसाठी विद्यार्थ्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थीती तितकीच जबाबदार असते. विद्यार्थ्यांच्या घरातील आर्थिक परिस्थितीनुसार त्यांना शिक्षणास प्रेरणा मिळत असते. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली असेल तर विद्यार्थी शिकण्यास प्रवृत्त होतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीमुळे त्यांच्या मनावर दडपण निर्माण होते व संपादनाबाबत चिंता त्यांच्या मनात निर्माण होते.

वरील परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस अडथळे निर्माण होत असतात. त्याचप्रमाणे ग्रामिण भागातील विद्यार्थी व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत गुणसंपादनात मागे पडतांना दिसतो. या सर्व घटकांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज दिसून येते.

## संशोधनाची उद्दीष्टये:

१)महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गुणसंपादनाचा अभ्यास करणे

२)महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या बुध्दिमत्तेचा अभ्यास करणे

३)महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मिळणाऱ्या संपादन प्रेरणेचा अभ्यास करणे

**परिकल्पना:**

१)महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गुणसंपादनात फरक नसतो

२)महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या बुध्दिमत्तेत फरक नसतो

३)महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मिळणाऱ्या संपादन प्रेरणेचा फरक नसतो

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधना माहिती संकल्पनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

न्यादर्श – प्रस्तृत संशोधनासाठी न्यादर्शाची निवड सहेतूक नमुना निवड पदधतीने नागपूर जिल्हयातील महानगरपालिका शाळेतील माध्यमिक स्तरावरील १००० विदयार्थी व जिल्हापरिषद शाळेतील १००० विदयार्थी याप्रमाणे एकूण २००० विदयार्थ्यांची निवड केली आहे.

**माहीती संकलनाची साधने :**

**१) बुध्दिमत्ता चाचण्धी (Verbal Intelligence Test) डॉ.आर.के. ओझा, डॉ. के. राय चौधरी**

**२) संपादन प्रेरणा चाचणी (Achievement Motivation Test)**

**डॉ. व्ही. पी. श्रीवास्तव**

**३) गुणसंपादनासाठी मागील वर्षाच्या वार्षिक परिक्षेतील गुण संकलीत केले आहे. व त्याचा वापर गुणसंपादनाचे मापन करण्यासाठी करण्यात आला.**

**विश्लेषण व अर्थनिर्वचन**

**उदिष्ट १) महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गुणसंपादनाचा अभ्यास करणे**

**महानगरपालिका शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे गुणसंपादन**

| अ.क्र | महानगरपालीका शाळांमधील माध्यमिक स्तरावरील गुणसंपादन | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अत्यंत निम्म | ४५५ | ४५.५% |
| २ | निम्म | ४८८ | ४८.८% |
| ३ | स्रासरी | २५ | २.५% |
| ४ | चांगले | १८ | १.८% |
| ५ | उत्तम | १४ | १.४% |
| | एकुण | १००० | १००% |

**अर्थनिर्वचन :–वरील सारनीवरून लक्षात येते की महानगर शाळामधील माध्यमिक स्तरावरील एकूण न्यायदर्शक विद्यार्थ्यांपैकी ४८८ (४८.८ %) विद्यार्थ्यांचे गुणसंपादन निम्न आहे. तर ४५५ (४५.५%) विद्यार्थ्यांचे गुणसंपादन निम्न आहे. २५ (२.५%) विद्यार्थ्यांचे गुणसंपादन सरासरी इतके असुन १८ (१.८%) विद्यार्थ्यांचे गुणसंपादन चांगले आहे व १४ (१.४%) विद्यार्थ्यांचे गुणसंपादन उत्तम आहे.**

**यावरून लक्षात येते की महानगर पालीका शाळेतील माध्यमिक स्तरावरील बहुतांच ४८८(४८.८%)विद्यार्थ्याचे गुणसंपादन निम्न आहे.**

**जिल्हा परिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्याची गुणसंपादन दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | जिल्हा परिषद शाळांमधील विदयार्थ्याची बुध्दिमत्ता | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अत्यंत निम्न | ८१ | ८.१% |
| २ | निम्न | ११० | ११.०% |
| ३ | सरासरी | २४६ | २४.६% |
| ४ | चांगले | २३३ | २३.३% |
| ५ | उत्तम | ३३० | ३३.०% |
| | एकुण | १००० | १००% |

**अर्थनिवर्चन :– वरील सारणीवरून लक्षात येते की, जिल्हा परिषद शाळामधील माध्यमिक स्तरावरील एकुण न्यादर्श विदयार्यापैकी २४६(२४.६%) विदर्यार्थ्यांची गुणसंपादन सरासरी आहे. तर २३३ (२३.३%)** विदयार्थाचे गुणसंपादन चांगले आहे. **विदर्यार्थ्यांची गुणसंपादन चांगले आहे. ३३० (३३.०%)** विदयार्थाचे गुणसंपादन उत्तम असुन ११० **(११.०%)** विदयार्थाचे गुणसंपादन निम्न आहे व **८१ (८.१%)** विदयार्थाचे गुणसंपादन अत्यंत निम्न आहे.

**यावरून लक्षात येते की,महानगरपालिका शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांचे गुणसंपादन निम्न असुन जिल्हा परिषद शाळामधील माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्याचे गुणसंपादन उतत असल्याचे दिसुन येते.**

**महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यच्योा गुणसंपादनातील फरक**

**( t मूल्य) दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | चल | एकुण विद्यार्थ्याची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | t मूल्य | सार्थकता स्तर ०.०१ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थी | १००० | ४५.९५ | १३.६३ | ४२.०२ | सार्थक ** |
| २ | जिल्हापरिषद शाळांमधील विद्यार्थी | १००० | ७१.५८ | १३.३५ | | |

Number of Group = 2

(N1+N2=N)N=2000

For df=1998

सारणी मुल्य 0.01 स्तरावर = 2.58

0.05 स्तरावर = 1.96

उदिष्ट २

महानगरपालीका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या बुध्दीमत्तेचा अभ्यास करणे.

महानगरपालीका शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या बुध्दीमत्ता दर्शविणारी सारणी

| अ.क्र | महानगरपालीका शाळांमधील विदयार्थ्यांची संपादन प्रेरणा | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अती श्रेष्ठ | २४ | २.४% |
| २ | श्रेष्ठ | ९२ | ९.२% |
| ३ | तिव्र – सामान्य | ९७ | ९.७% |
| ४ | सरासरी / सामान्य | ३९५ | ३९.५% |
| ५ | मंद सामान्य | २०५ | २०.५% |
| ६ | सिमावर्ती | ११० | ११.०% |
| ७ | दोषपूर्ण | ११६ | ११.६% |
| | एकूण | १००० | १००% |

जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांची बुध्दीमत्ता दर्शविणारी सारणी

| अ.क्र | जिल्हा परिषद शाळांमधील विदयार्थ्यांची बुध्दिमत्ता | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अति श्रेष्ठ | २० | २.०% |
| २ | श्रेष्ठ | ७८ | ७.८% |
| ३ | व्रीव –सामान्य | ८० | ८.०% |
| ४ | सरासरी सामान्य | ४२० | ४२.०% |
| ५ | मंद सामान्य | २११ | २१.१% |
| ६ | सिमावर्ती | १३३ | १३.३% |
| ७ | दोषपुर्ण | १४३ | १४.३% |
| ८ | एकुण | १००० | १००% |

अर्थनिवर्चन :– वरील सारणीवरून लक्षात येते की, महानगरपालिका शाळेतील माध्यमिक स्तरावरील एकुण न्यादर्श विदयार्यिपैकी ३९५(३९.५%) विदयार्थी सामान्य बुध्दिमत्ता असलेले आहे. तर जिल्हापरीषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील एकुण न्यादर्शपैकी ४२०(४२.०%) विदयार्थी सामान्य बुध्दिमत्तेचे आहे.

महानगर पालीका शाळेतील ९२ (९.२:) विदयार्थी श्रेष्ठ बुध्दिमत्तेचे दिसुन येते तर जिल्हा परिषद शाळेतील ७८(७.८%) विदयार्थी श्रेष्ठ बुध्दिमत्ता असलेले दिसुन येते.

यावरून लक्षात येते की, महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील अनुक्रमे ३९५(३९.५%) व ४२०(४२.०%) विदयार्थ्यांची बुध्दिमत्ता सामान्य असल्याची दिसुन येते.

महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या बुध्दिमत्तेमधील फरक

| अ.क्र | चल | एकुण विद्यार्थ्यांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | t मूल्य | सार्थकता स्तर ०.०१ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थी | १००० | ८०.९९ | १५.०८ | ३.०६ | सार्थक ** |
| २ | जिल्हापरिषद शाळांमधील विद्यार्थी | १००० | ७८.९७ | १४.५४ | | |

Number of Group =2

(N1+N2=N)N = 2000

For df =1998

सारणी मुल्य 0.01 स्तरावर = 2.58

0.05 स्तरावर = 1.96

उदिष्ट ३

महानगरपालीका शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांची संपादन प्रेरणा दर्शवणारी सारणी

| अ.क्र | महानगरपालीका शाळांमधील विदयार्थ्यांची संपादन प्रेरणा | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | उच्च | ८२१ | ८२.१% |
| २ | सरासरीपेक्षा जास्त | ४० | ४.०% |
| ३ | सरासरी | ५९ | ५.९% |
| ४ | सरासरीपेक्षा कमी | ५४ | ५.४% |
| ५ | कमी | २६ | २.६% |
| | एकूण | १००० | १००% |

जिल्हा परिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांची संपादन प्रेरणा दर्शवणारी सारणी

| अ.क्र | जिल्हापरिषद शाळांमधील विदयार्थ्यांची संपादन प्रेरणा | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | उच्च | ७१३ | ७१.३% |
| २ | सरासरीपेक्षा जास्त | ६१ | ६.१% |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | सरासरी | १२६ | २.६% |
| ४ | सरासरीपेक्षा कमी | ४४ | ४.४% |
| ५ | कमी | ५६ | ५.६% |
| | एकुण | १००० | १०० |

अर्थनिर्वचन :— वरील सारणीवरून लक्षात येते की, महानगरपालिका शाळांमधील माध्यमिक स्तरावरील एकुण न्यायदर्शापेक्षा ८२१(८२.१) विदयार्थी उच्च संपादन प्रेरणा असणारे आहेत.

तर जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील एकुण न्यादर्शापैकी ७१३(७१.३) विदयार्थी उच्च संपादन प्रेरणा असणारे आहेत.

महानगरपालिका व जिल्हापरिषद शाळांमधील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेतील

फरक (**t** मूल्य) दर्शविणारी सारणी

| अ.क्र | चल | एकुण विद्यार्थ्यांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | **t** मूल्य | सार्थकता स्तर ०.०१ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थी | १००० | ३१.८७ | ९.६० | ८.३६ | सार्थक ** |
| २ | जिल्हापरिषद शाळांमधील विद्यार्थी | १००० | २८.३६ | ९.५३ | | |

Number of group = 2

(N1+N2=N) N = 2000

For df = 1998

सारणी मुल्य 0.01 स्तरावर = 2.58

0.05 स्तरावर = 1.96

संदर्भ ग्रंथसूची:—

कुलकर्णी, डी. आर.(२००९) 'प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र नागपुर: विद्या प्रकाशन.

जगताप, ह. ना.(१९९५),''शैक्षणिक मानसशास्त्र,'' पूणे: अनमोल प्रकाशन

देवतळे,अ.(१९८८), ''संशोधन पध्दती'' पुणे: नूतन प्रकाशन

शिक्षण संक्रमण(अंक १०), 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,'' पूणे:

राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१०